'मुख्य सुरक्षा अधिकारी' पदावर
दि.०१/०१/२०२४ रोजी काम करणाऱ्या
अधिकाऱ्यांची अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११ ०१८
क्र.सा.प्र.वि/१२/कावि/ ७८ /२०२५
दिनांक : ०८/०७/२०२५

वाचले क्र.
१) आदेश क्र.साप्रवि/१२/कावि/९२५/२०२४ दि.१०/१२/२०२४ अन्वये प्रसिध्द केलेली 'मुख्य सुरक्षा अधिकारी' पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी
२) श्री.जरांडे उदय यांचे आक्षेप अर्ज
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२५/०९/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव
४) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/५४५/२०२० दि. २७/१०/२०२०
५) सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०८/०७/ २०२५ चा मान्य प्रस्ताव

## आदेश

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय,मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१ अन्वये दि.०१/०१/२०२४ रोजी **'मुख्य सुरक्षा अधिकारी'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरच्या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मधील अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, ज्येष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा यादीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'मुख्य सुरक्षा अधिकारी'** पदाची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत सर्व संबंधित शाखाप्रमुखांकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्याने अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीवर **एक** आक्षेप प्राप्त झालेला आहे.

**शैक्षणिक अर्हतेमध्ये दुरुस्तीबाबत -**

श्री.जरांडे उदय यांनी वाढीव शैक्षणिक अर्हतेची नोंद घेणेबाबत दाखल केलेले आक्षेप, अर्हतेचे दाखले पाहून आक्षेप मान्य करण्यात आला आहेत. तरी उपरोक्त मान्य आक्षेपाची यथार्थ नोंद अंतिम सेवाज्येष्ठतायादी मध्ये घेण्यात येत आहे.

सबब उपरोक्त वाचले क्रमांक ४ चे प्राप्त अधिकारान्वये **'मुख्य सुरक्षा अधिकारी'** पदाची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ नुसार अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ही अंतिम सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विजयकुमार खोराटे)
अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रतः- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

मुख्य सुरक्षा अधिकारी पदाची दि.01/01/2024 रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S -23 वेतनश्रेणी :- 67700 - 208700

| अ.क्र | संगणक क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | मुख्य सुरक्षा अधिकारी पदावरील रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 10634 | जरांडे उदय गणपत | खुला | एम.बी.ए., एम.ए., एल.एल.बी., डीप्लोमा इन लेबर लॉ ॲण्ड लेबर वेल्फेअर, एम.एस.सी.आय.टी | 22/03/1976 | 15/12/2020 | पदोन्नती | सुरक्षा अधिकारी | 04/04/2013 | 31/03/2034 | शासन मंजुरीच्या अधिन राहून नाव समाविष्ट करण्यात आले आहे. |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

(विजयकुमार खोराटे)
अतिरिक्त आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018